# प्रकरण - एक

## प्रास्ताविक

## १.१ संशोधन समस्येची पार्श्वभूमी :

विविध व्यवसायात रूजू झालेल्या मानवी बळांपैकी अधिक मानवीबळ शिक्षक या नात्याने आपली भूमिका बजावत आहे. यामध्ये पूर्वप्राथमिक, प्राथमिक, माध्यमिक, महाविद्यालयीन शिक्षकांचा समावेश होतो. प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीतीने ३५ लाख लोक या व्यवसायामध्ये सहभागी झालेले आहेत. एकंदरीत या संख्येवरून शिक्षकाचे राष्ट्रीय जीवनातील महत्त्व स्पष्ट होते. शिक्षण हे राष्ट्र बांधणीचे काम असल्याने शिक्षणास अनन्य साधारण महत्त्व आहे. शिक्षकाचा प्रत्यक्ष संबंध आपल्या सामाजिक व सांस्कृतिक जीवनाशी येतो. शिक्षण प्रसारामुळे शिस्तप्रिय, सक्षम व कार्यक्षम नागरिक घडविता येतात.[१]

विद्यार्थ्यांना विशिष्ट माहिती द्यावयाची म्हटले तरी ती आजच्या काळात यंत्राद्वारेसुध्दा देता येईल परंतु विद्यार्थ्यांच्या वर्तनात परिवर्तन करावयाचे म्हटल्यास एका संपन्न व्यक्तिमत्वाचा दुसऱ्या अपरिपक्व व्यक्तिमत्वावर सातत्याने व समर्थपणे होणारा परिणाम या दृष्टिकोनातून शिक्षकाकडे पाहिले पाहिजे. शिक्षण प्रक्रियेकडे या दृष्टिकोनातून पाहिल्यास ती प्रत्यक्षात साकारण्यासाठी विशिष्ट माहिती पाठ असलेली व माहिती देऊ शकणारी मानवी यंत्रे म्हणजे शिक्षक (रस्किन) ही मर्यादित दृष्टी सोडून द्यावी लागते. त्याऐवजी विद्यार्थ्यांत कोणत्या प्रकारचे वर्तन परिवर्तन अपेक्षित आहे, या बद्दलची सामाजिक, तात्त्विक व मानसशास्त्रीय जाणीव असलेल्या स्वत:च्या विषयात पारंगतता प्राप्त केलेला, विविध अध्यापन पध्दती व तंत्रे या विषयी जागरूक असलेल्या संपन्न व्यक्तिमत्वाचा माणूस आपल्या नजरेसमोर येतो. अशाप्रकारचे गुण प्रत्येक शिक्षकात जन्मजात असतील अशी कल्पना करणे चुकीचे ठरेल. याचाच अर्थ वरील प्रकारचा शिक्षक घडवावा लागेल.[२]

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये शिक्षणाचा विकास जलद गतीने होत आहे. या व्यापक अशा कार्यक्रमामध्ये भावी नागरिकांना उत्तम असे शिक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहेत. सातव्या पंचवार्षिक योजनेमध्ये नवीन शैक्षणिक धोरण जाहिर झालेले आहे.

शिक्षणाचा दर्जा हा शिक्षकाच्या गुणवत्तेशी संबंधित किंवा निगडीत आहे. शिक्षण पध्दती सुधारण्यासाठी कार्यक्षम शिक्षकांची निर्मिती करणे आवश्यक आहे. आंतरराष्ट्रीय शिक्षक परिषदेत असे घोषित करण्यात आले होते की, " चांगले अध्यापन हे चांगल्या शिक्षकावर अवलंबून आहे. म्हणून शिक्षकांची गुणवत्ता सुधारणे हे आपले ध्येय असावे." भारताचे माजी शिक्षण मंत्री मा. एम.सी. छागला यांनी देखील असे म्हटले आहे की, " प्रशिक्षित व सक्षम शिक्षकाशिवाय कोणतीही शिक्षण पध्दती यशस्वी होत नाही. ज्या देशामध्ये सक्षम शिक्षक असतात त्या देशाला उज्ज्वल भवितव्य प्राप्त होते. शिक्षक हा शिक्षण पध्दतीचा कणा आहे."[३]

परिणामकारक शिक्षण पध्दतीच्या विकासासाठी, शिक्षण प्रशिक्षणासाठी व्यापक व सविस्तर योजना हव्यात. त्यामुळे राष्ट्रीय शिक्षण पध्दतीचा विकास होईल. कोठारी आयोगामध्ये शिक्षकांचा दर्जा वाढविण्यासाठी अनेक योजनांची शिफारस केलेली आहे.

हे प्रशिक्षण डी.एड्. व बी.एड्. महाविद्यालयातून दिले जाते. परंतु या प्रशिक्षणाबाबत काही समज गैरसमज निर्माण झाले आहेत. बी.एड्. प्रशिक्षणाबाबत निर्माण झालेल्या गैरसमजांपैकी काही गैरसमज पुढील प्रमाणे :

१) शिक्षण प्रशिक्षणसंस्थांची विद्यापीठाच्या एकूण बौध्दिक ( academic ) जीवनाशी व शाळांतील दैनंदिन प्रश्नांशी फारकत आहे.

२) काही अपवाद वगळता प्रशिक्षण संस्थांचा दर्जा सर्वसाधारण किंवा निकृष्ठ आहे.

३) प्रशिक्षणाचे कार्यक्रम पारंपारिक स्वरूपाचे आहेत.

४) आजच्या गरजा व ध्येये यांच्याशी विसंवादी अशा साचेबंद पध्दतीने सराव पाठाचे काम चालते.

५) बी.एड्. महाविद्यालयातील अभ्यासेतर कार्यक्रम अतिशय सुमार दर्जाचे असतात.

६) वेळेच्या मानाने अभ्यासक्रमाची व्याप्ती जास्त आहे.

७) प्राध्यापकांचे मार्गदर्शन योग्य मिळत नाही.

इत्यादी तेव्हा ही परिस्थिती समजावून घेऊन त्याची कारणमीमांसा करणे अगत्याचे वाटल्याने या विषयाची संशोधनासाठी निवड केली.[४ व ५]

प्रस्तुत संशोधक शिक्षणशास्त्र या विषयाची पदव्युत्तर परीक्षा उत्तीर्ण झालेला असून गेली तीन वर्षे शिक्षण-प्रशिक्षण महाविद्यालयात अध्यापन करत आहे. त्यामुळे बी.एड्. महाविद्यालयातील अध्ययन-अध्यापन हा त्याचा जिव्हाळ्याचा विषय आहे हेही या विषयाची संशोधनासाठी निवड करण्याचे एक प्रमुख कारण आहे.

## १.२ संशोधन समस्येचे शब्दांकन :

प्रस्तुत समस्येचे शब्दांकन खालील प्रमाणे केले आहे :

"कोल्हापूर जिल्ह्यातील शिवाजी विद्यापीठाशी संलग्न असणाऱ्या अध्यापक महाविद्यालयातील प्रात्यक्षिक काम व त्यामधील प्राध्यापक व प्रशिक्षणार्थी यांच्या समस्यांचा चिकित्सात्मक अभ्यास."

संशोधन हे एक शास्त्रीय कार्य असल्याने विविध संज्ञांचा वापर करताना तो एकाच आणि त्या अर्थाने सातत्याने करणे अगत्याचे आहे. त्यासाठी संशोधनात वापरलेल्या संज्ञांच्या व्याख्या करणे आवश्यक ठरते. त्यासाठी आणि प्रस्तुत संशोधनाच्या समस्येच्या विधानात वापरलेल्या विविध संज्ञांच्या स्पष्टीकरणासाठी त्यांच्या व्याख्या पुढीलप्रमाणे केलेल्या आहेत.

अध्यापक महाविद्यालय -

वास्तविक अध्यापक महाविद्यालयात डी.एड्. व बी.एड्. स्पेशल बी.ए.बी.एड्. या महाविद्यालयांचा समावेश होतो. तथापि डी.एड्. महाविद्यालयाचा कालावधी दोन वर्षांचा असतो. स्पेशल बी.ए.बी.एड्. महाविद्यालयातील प्रशिक्षणाचा कालावधी चार वर्षांचा असतो परंतु बी.एड्. महाविद्यालयाचा कालावधी हा एक वर्षाचा असतो. प्रस्तुत संशोधनात एक वर्षाच्या या बी.एड्. अभ्यासक्रमातील प्रात्यक्षिकांच्या कार्यवाहीमधील समस्यांचा विचार केला असल्यामुळे प्रस्तुत संशोधनापुरते अध्यापक महाविद्यालय म्हणजे बी.एड्. महाविद्यालय एवढ्याच पुरता त्याचा अर्थ मर्यादित आहे.

प्रात्यक्षिक काम -

प्रात्यक्षिक काम म्हणजे बी.एड्. महाविद्यालयात करावी लागणारी विषयवार प्रात्यक्षिके सोडून सर्व प्रात्यक्षिके होत. प्रात्यक्षिके घेण्याचे कारण की, बी.एड्.च्या अभ्यासक्रमात स्वतंत्र असा बी.एड्. भाग दोन असा प्रात्यक्षिकांचा भाग आहे.

प्रात्यक्षिक कामातील समस्या -

हा शब्दप्रयोग बी.एड्. अभ्यासक्रमातील भाग-२ यातील प्रात्यक्षिकांच्या कार्यवाहीतील प्रात्यक्षिके करत असताना येणाऱ्या अडचणी व प्रात्यक्षिके करवून घेत असताना येणाऱ्या अडचणी या अर्थी वापरलेला आहे.

चिकित्सात्मक -

चिकित्सात्मक म्हणजे सूक्ष्म, सांगोपांग व सविस्तर अभ्यास.

सूक्ष्म अभ्यासामध्ये बी.एड्. अभ्यासक्रमामध्ये जी वेगवेगळी प्रात्यक्षिके आहेत त्यांच्यातील समस्यांचा विचार केलेला आहे.

सांगोपांग अभ्यासामध्ये विद्यार्थी व प्राध्यापक या दोघांच्याही समस्यांचा विचार केला आहे.

सविस्तर अभ्यासामध्ये कोल्हापूर जिल्हातील पाच अध्यापक महाविद्यालयांचा समावेश केला आहे. ती खालील प्रमाणे.

१) श्री. महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, कोल्हापूर.
२) आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय, गारगोटी.
३) वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर.
४) अध्यापक महाविद्यालय शाहू शिक्षण प्रसारक मंडळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
५) अध्यापक महाविद्यालय, बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, पेठ वडगांव.

यापैकी पहिल्या दोन महाविद्यालयांना दीर्घ परंपरा आहे तर बाकीची तीन अध्यापक महाविद्यालये नवीन आहेत.

१.३ संशोधनाचे महत्व व व्याप्ती :

प्रस्तुत शोध प्रबंधात बी.एड्. महाविद्यालयातील प्रात्यक्षिक कामाच्या कार्यवाहीमध्ये विद्यार्थ्यांना येणाऱ्या अडचणींचा विचार केला आहे आणि या विद्यार्थ्यांकडून प्रात्यक्षिक काम करवून घेणाऱ्या अध्यापकांच्या अडचणींचाही शोध घेतला आहे. तसेच संशोधनासाठी आवश्यक असलेली सैध्दांतिक पार्श्वभूमी विशद केली आहे.

सध्या बी.एड्. महाविद्यालयात प्रात्यक्षिक काम ज्या पध्दतीने चालते त्या संदर्भात ज्या अडचणी वारंवार भेडसावत आहेत त्याचा सखोल अभ्यास करुन त्यातून जे उपयोगी पडेल त्या द्वारा प्रात्यक्षिक काम योग्य प्रकारे होण्याच्या दृष्टीने वाटचाल करता येईल असा विश्वास वाटतो.

बी.एड्. अभ्यासक्रम हा एक वर्षाचा आहे व प्रात्यक्षिक कामाचा अभ्यासक्रम पाहिला तर तो फारच विस्तीर्ण आहे. कमीतकमी वेळात जास्तीत-जास्त काम असे त्याचे स्वरूप आहे. या परिस्थितीत या प्रात्यक्षिक कामातील मूलभूत कौशल्ये व उद्दिष्टे याकडे सूक्ष्म व विशेष लक्ष या विद्यार्थ्यांनी देणे दुर्मिळ होत असल्याने याचे महत्व अधिकच जाणवत आहे.[६] त्यामुळे ही जबाबदारी पार पाडत असताना प्रशिक्षणार्थींना व प्राध्यापकांना येणाऱ्या समस्यांचा विचार करणे महत्वाचे ठरते.

प्रात्यक्षिक काम योग्य प्रकारे कसे करवून घ्यावे व करावे याचे सम्यक् उत्तर मिळवयाचे असेल तर या समस्यांचा विचार नक्कीच महत्वाचा आहे.

प्रात्यक्षिक कामाच्या समस्या विविध व व्यापक आहेत. वेगवेगळ्या प्रात्यक्षिक कामानुसार वेगवेगळ्या समस्या आहेत. उदा. सराव पाठ, वेळ कमी, पदवीला विषय नाही, अध्यापन कौशल्ये आत्मसात होत नाहीत, उद्दिष्टे स्पष्टीकरणे समजत नाहीत, शैक्षणिक साधनांचा वापर योग्य प्रकारे होत नाही, या पध्दतीचा प्रत्यक्ष अध्यापनात उपयोग नाही इत्यादी.

तसेच प्राध्यापकांच्या बाबतीत कमी वेळ विस्तृत प्रात्यक्षिक काम, विद्यार्थ्यांचे विविध स्तर, विद्यार्थ्यांची आवड, आवश्यक साहित्याचा अभाव या सारख्या समस्या त्रासदायक स्वरूप धारण करतात.[७] अशा विविध कारणांनी उद्भवलेल्या या समस्या आहेत. त्यांच्यावरील उपाययोजना बी.एड्.महाविद्यालयातील विद्यार्थी व प्राध्यापक यांना उपयुक्त होतील असे वाटते.

१.४ <u>संशोधनाची उद्दिष्टे</u> :

प्रस्तुत संशोधनाची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत :

१) प्रात्यक्षिके आणि त्यासाठी देण्यात आलेला वेळ योग्य आहे काय ते पहाणे.

२) प्रात्यक्षिकासाठी कॉलेजमधून उपलब्ध असणाऱ्या शैक्षणिक साहित्याचा अभ्यास करणे.

३) प्रात्यक्षिकाद्वारे दिल्या जाणाऱ्या गुणदान योजनेबाबत विचार करणे.

४) प्रात्यक्षिके आणि त्यातील विविधता यांचा अभ्यास करणे.

५) प्रात्यक्षिकांसाठी ठेवलेल्या उद्दिष्टांची पूर्तता होते की नाही ते पहाणे.

६) सराव पाठ व सूक्ष्म अध्यापन पाठ यांच्या संख्येचा अभ्यास करणे.

७) समाज उपयोगी उत्पादक कार्य व समाजसेवा या प्रात्यक्षिकांची कार्यवाही कशी होते याचा अभ्यास करणे.

८) प्रकल्प व त्याची आवश्यकता याचा अभ्यास करणे.

९) सांस्कृतिक कार्यक्रम व शारीरिक शिक्षण यासाठी केल्या जाणाऱ्या प्रात्यक्षिकांची पहाणी करणे.


१०) एकूण प्रात्यक्षिकाबाबत विद्यार्थ्यांचे आणि प्राध्यापकांचे मनोगत समजावून घेणे.

११) प्रात्यक्षिकाबाबत विधायक सूचना जमा करणे आणि विधायक सूचनाद्वारे प्रात्यक्षिकासाठी दिला जाणारा वेळ गुणदान योजना कार्यपध्दती, शैक्षणिक साधने इत्यादी बाबत शिफारशी करणे.

१२) अशा प्रकारे गोळा केलेल्या माहितीच्या आधारे प्रात्यक्षिकांच्या अभ्यासक्रमात नवीन बदल सूचविणे.

## १.५ संशोधनाच्या मर्यादा :

हे संशोधन कोल्हापूर जिल्हापुरतेच मर्यादित आहे. सबब या संशोधनात कोल्हापूर जिल्ह्यातील फक्त पाच अध्यापक महाविद्यालयांचा विचार केलेला आहे. ही महाविद्यालये खालील प्रमाणे :




आकृती क्र. १.१ कोल्हापूर जिल्ह्याचे क्षेत्र आणि त्या क्षेत्रात येणारी अध्यापक महाविद्यालये.

१. वसंतराव नाईक अध्यापक महाविद्यालय, दसरा चौक, कोल्हापूर.
२. श्री. महाराणी ताराबाई अध्यापक महाविद्यालय, शाहुपूरी, कोल्हापूर.
३. आचार्य जावडेकर अध्यापक महाविद्यालय, गारगोटी.
४. अध्यापक महाविद्यालय शाहू प्रसारक मंडळ, शिवाजी पेठ, कोल्हापूर.
५. अध्यापक महाविद्यालय, बाळासाहेब माने शिक्षण प्रसारक मंडळ, पेठ वडगांव

(कोल्हापूर जिल्हाचे क्षेत्र आणि त्या क्षेत्रात येणारी अध्यापक महाविद्यालये यांचा नकाशा पृष्ठांक वर दिलेला आहे.)

प्रस्तुत संशोधन शैक्षणिक वर्ष १९८७-८८ या शैक्षणिक वर्षा-पुरतेच मर्यादित आहे.

वरील अध्यापक महाविद्यालयातील फक्त समाजसेवा समाज उपयोगी उत्पादक कार्य, सराव पाठ, सूक्ष्म अध्यापन पाठ, सांस्कृतिक कार्यक्रम, शैक्षणिक साधने तयार करणे, प्रकल्प मानसशास्त्रीय प्रयोग व वार्षिक पाठ या प्रात्यक्षिकांच्या कार्यवाहीबाबत प्रशिक्षणार्थी व प्राध्यापक यांच्या समस्यांचाच विचार केलेला आहे.

१.६ <u>प्रकरणीकरण</u> :

<u>प्रकरण एक : विषय प्रवेश</u>

या प्रकरणामध्ये ही समस्या कशी निर्माण झाली याचा ऊहापोह केला असून समस्येचे शब्दांकन केलेले आहे. संशोधनाचे महत्त्व, व्याप्ती, मर्यादा यांचे स्पष्टीकरण केलेले आहे. थोडक्यात हे प्रकरण संशोधनाची पार्श्वभूमी स्पष्ट करणारे आहे.

**प्रकरण दोन : संबंधित संशोधनाचा अभ्यास व संशोधन पध्दती**

या प्रकरणामध्ये संशोधनासाठी निवडलेल्या विषयाच्या संबंधित साहित्य व संशोधन याचा अभ्यास केलेला आहे, तसेच या संशोधनासाठी वापरलेल्या पध्दतीचीही थोडक्यात माहिती दिली आहे.

**प्रकरण तीन : प्रात्यक्षिक काम - अर्थ, स्वरूप व उद्दिष्टे**

प्रस्तुत प्रकरणात संशोधनासाठी आवश्यक असलेली सैध्दांतिक पार्श्वभूमी विशद केली आहे. बी.एड्. महाविद्यालयातील प्रात्यक्षिक काम हा संशोधनाचा विषय असल्यामुळे विविध प्रात्यक्षिक कामाचा अर्थ, स्वरूप, उद्दिष्टे इत्यादी गोष्टींचा उहापोह केलेला आहे.

**प्रकरण चार : बी.एड्. महाविद्यालयातील प्रात्यक्षिक कामाच्या कार्यवाहीतील प्रशिक्षणार्थींच्या समस्या**

बी.एड्. महाविद्यालयातील प्रात्यक्षिक कामाच्या कार्यवाहीतील प्रशिक्षणार्थींना कोणकोणत्या समस्या येतात त्या समस्यांचे वर्गीकरण पृथःक्करण केलेले असून अन्वयार्थ लावलेला आहे.

**प्रकरण पाच : बी.एड्. महाविद्यालयातील प्राध्यापकांना प्रात्यक्षिके करवून घेत असताना येणाऱ्या समस्या**

या प्रकरणात प्रात्यक्षिक काम करवून घेणाऱ्या प्राध्यापकांच्या समस्यांचे वर्गीकरण, विश्लेषण करून अन्वयार्थ लावलेला आहे.

## प्रकरण सहा : निष्कर्ष व शिफारशी

या प्रकरणात प्रकरण चार व पाचमध्ये गोळा केलेल्या सामग्रीच्या लावलेल्या अन्वयार्थांच्या सहाय्याने निष्कर्ष काढलेले आहेत. या निष्कर्षांवर आधारित शिफारशींचा निर्देश केलेला आहे.

तसेच प्रस्तुत संशोधनासाठी प्रत्यक्षपणे निगडीत नसलेल्या तथापि उपयुक्त ठरणाऱ्या काही समस्यांचा पुढील संशोधनासाठी निर्देश केलेला आहे.

# संदर्भ सूची


१) Sharma, A.P. : Contemporary Problems of Education, (Delhi : Vani Education Books, 1984), p.91.

२) पाटील लीला, विश्वंभर कुलकर्णी : आजचे शिक्षण आजच्या समस्या, (पुणे : श्री. विद्या प्रकाशन, १९८५), पृ.१६१.

३) Khanna S.D. : Current Problems of Indian Education, (Delhi : Douba House, Book Sellers and Pub., Delhi, 1985), p. 257, 258.

४) नानकर, प्र.ल., भारतीय शिक्षण, मे-जून, १९८४, (मुंबई : संपादक राम गांगल, अध्यापन समस्या विशेषांक, बी.एड्. प्रशिक्षणाबाबत समज गैरसमज), पृ.२१०.

५) गोगटे, श्री.ब. : मराठवाड्यातील शिक्षण (पुणे : इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ एज्युकेशन, १९८६), पृ.२१६, २१७.

६) पाटणकर ना.वि. : शिक्षण आणि समाज, एप्रिल-जून १९८६, (संपादिका : चित्रा नाईक, माध्यमिक शाळातील शिक्षकांचे प्रशिक्षण काही उणीवा आणि दूर करण्याचे उपाय), पृ.२७६.

७) नागोसे चंद्रशेखर : शिक्षण समीक्षा, आक्टोबर-नोव्हेंबर, १९८६, (संपादक : म.बा. कुंडले, अध्यापक शिक्षण अभ्यासक्रमातील क्रांतिकारी बदलाची गरज), पृ. ७९.